आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३० मे २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यातला प्रचार थंडावला
- काँग्रेस आणि इंडिया आघाडीनं नेहमीच स्वार्थ आणि मतपेढीचं राजकारण केल्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची, तर भाजपा सरकारच्या कार्यकाळात देशाच्या अर्थव्यवस्थेत घसरण झाली असल्याची माजी प्रधानमंत्री डॉ.मनमोहन सिंह यांची टीका
- चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर सात टक्के राहण्याचा रिझर्व्ह बँकेचा अंदाज
- जम्मू- काश्मीरमध्ये बस दरीत कोसळून २० जणांचा मृत्यू, १५ जखमी
- पहिल्या अखंड त्रिमितीय प्रिंटेड इंजिन असलेल्या रॉकेटचं यशस्वी प्रक्षेपण

  **आणि**
- नैर्ऋत्य मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातला प्रचार आज संध्याकाळी थंडावला. या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ५७ लोकसभा मतदारसंघात येत्या शनिवारी मतदान होणार आहे. त्यात बिहारमधल्या ८, हिमाचल प्रदेशातल्या ४, झारखंडच्या ३, ओदिशातल्या ६, पंजाबमधल्या सर्व १३, उत्तरप्रदेशातल्या १३, पश्चिम बंगालमधल्या ९, आणि चंडीगढमधल्या एका जागेचा समावेश आहे. या टप्प्यात एकंदर ९०४ उमेदवार नशीब आजमावत आहेत.

ओदिशा विधानसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदानही येत्या शनिवारी होणार असून त्या ४२ विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे.

लोकसभा निवडणुकीच्या सर्व टप्प्यांची मतमोजणी येत्या ४ जून रोजी होईल. तसंच आंध्रप्रदेश आणि ओदिशातल्या विधानसभा निवडणुकांची आणि देशभरातल्या विविध राज्यात झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकांची मतमोजणी देखील ४ जून रोजी होईल. अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभा निवडणुकीची मतमोजणी २ जून रोजी होणार आहे.

<><><><><>

काँग्रेस आणि इंडिया आघाडीनं नेहमीच स्वार्थ आणि मतपेढीचं राजकारण केल्याची टीका  प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी केली आहे. ते आज पंजाबमध्ये होशियारपूर इथं पक्षाच्या प्रचार सभेला संबोधित करत होते. काँग्रेसनं केवळ स्वार्थापोटी राममंदिराच्या उभारणीला सातत्यानं विरोध केला असून आता हा पक्ष नागरिकत्व सुधारणा कायद्यालाही विरोध करत असल्याचं ते यावेळी म्हणाले. दलित, ओबीसी आणि मागास वर्गीयांचं आरक्षण कोणीही हिसकावून घेऊ शकत नाही,  याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज पंजाबमध्ये नवनशार आणि खाटकारलान इथं प्रचारसभा घेतली तर आम आदमी पार्टीचे संस्थापक अरविंद केजरीवाल यांनी संगुर मध्ये रोड शो केला. शिरोमणी अकली दलाचे नेते सुखविर सिंग बादल यांनीही विविध ठिकाणी प्रचार केला.

<><><><><>

भाजपा सरकारच्या कार्यकाळात देशाच्या अर्थव्यवस्थेत अकल्पनीय उलथापालथ झाली असल्याची टीका माजी प्रधानमंत्री डॉ.मनमोहन सिंह यांनी

केली आहे. पंजाबच्या मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी लिहिलेल्या पत्रात त्यांनी हे म्हटलं आहे. भाजपा सरकारच्या काळात जीडीपी वाढीचा सरासरी दर ६ टक्क्यापेक्षा कमी राहिला असून, काँग्रेस-यूपीए सरकारच्या काळात तो ८ टक्के होता, असा दावा त्यांनी केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोपही मनमोहन सिंह यांनी केला आहे.

दरम्यान, भाजपानं या आरोपांचं खंडन करत, काँग्रेस सरकारच्या कार्यकाळात कमकुवत धोरणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेची गणना जगातल्या ५ नाजूक अर्थव्यवस्थांमध्ये केली जात होती असं म्हटलं आहे.

**<><><><><>**

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज दुपारी उत्तर प्रदेशातल्या कुशीनगर इथं प्रचार केला. भाजपा यावेळी ४०० पार जागा मिळवणार असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर त्यांनी रोबर्टगंज आणि चादौली मतदारसंघातही प्रचार केला. मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी कुशीनगर आणि सोनभद्र इथं रोड शो केला. समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी महाराजगंज आणि गोसी मतदारसंघात प्रचार केला.

झारखंडमध्येही विविध पक्षाच्या दिग्गज नेत्यांनी प्रचारात भाग घेतला. भाजपा प्रदेशाध्यक्ष बाबुलाल मरांडी यांनी गोड्डा आणि साहिबगंज मध्ये प्रचारात भाग घेतला. झारखंड मुक्ती मोर्चाच्या नेत्या कल्पना सोरेन यांनी साहिबगंज आणि डुमका मतदारसंघात प्रचारसभा घेतल्या. राष्ट्रीय जनता दल आणि मार्क्सवादी पक्षाच्या नेत्यांनीही झारखंडमध्ये रोड शो केले.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३० मे २०२४ - गुरुवार

<><><><>

मतदानाच्या टक्केवारीत झालेल्या वाढीसंदर्भात पसरलेल्या अफवांचं निवडणूक आयोगानं खंडन केलं आहे. मतदानाच्या नोंदी असलेल्या फॉर्म -१७ सी ची प्रत उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींना दिलेली असते, त्यामुळे कुणीही टक्केवारीत वाढ करु शकत नाही, असं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं. मतदान आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांबाबत सर्व माहिती निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर अद्ययावत केली आहे, असं ते म्हणाले.

<><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेनं २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था सात टक्के दरानं वाढेल, असा अंदाज वर्तवला आहे. रिझर्व्ह बँकेनं आज चालू आर्थिक वर्षाचा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीतील मध्यवर्ती बँकेच्या कामकाजाचा समावेश केला आहे.

१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ मध्ये संपलेल्या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था गतिमान आणि अधिक मजबूत झाल्याचं रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवालात नमूद केलं आहे. यामुळे जीडीपीतही वाढ झाली असून तो ७ पूर्णांक ६ दशांश टक्के इतका झाला आहे.

<><><><>

जम्मू- काश्मीरमध्ये, जम्मू जिल्ह्यातल्या अखनूर मध्ये तुंगी मोर इथं आज दुपारी यात्रेकरूंना घेऊन जाणारी एक बस दरीत पडून झालेल्या अपघातात २० जणांचा मृत्यू झाला, तर १५ जण जखमी झाले. जखमींना अखनूर आणि जम्मू

इथल्या रुग्णालयांमध्ये उपचार सुरु आहेत. बसमधले सर्व यात्रेकरू उत्तरप्रदेश इथले होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी या दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

आयआयटी मद्रासचं स्टार्टअप असलेल्या अग्निकुल कॉसमॉसनं देशातल्या पहिल्या त्रिमितीय प्रिंटेड इंजिनासह रॉकेटची निर्मिती केली आहे. या रॉकेटचं यशस्वी प्रक्षेपण आज सकाळी सव्वासात वाजता श्रीहरीकोटा इथं देशातलं खासगी लाँचपॅड धनुष वरून केलं.

अखंड त्रिमितीय प्रिंटेड इंजिन असलेल्या रॉकेटची निर्मिती विशेष उल्लेखनीय आहे. अग्निबाण सबऑर्बिटल टेक्नॉलॉजिकल डेमॉन्स्ट्रेटर हे रॉकेट भारताचे पहिले अर्ध-क्रायोजेनिक इंजिनावर आधारीत रॉकेट असून ते संपूर्णपणे स्वदेशी बनावटीचे आहे.

अग्निबाण रॉकेटचं यशस्वी प्रक्षेपण करुन अंतराळ क्षेत्रात भारतानं स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आयआयटी मद्रासचं स्टार्टअप अग्निकुल कॉसमॉसचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पाऊस आज केरळमध्ये दाखल झाला असून, ईशान्य भारताच्या बहुतेक सर्व भागात तो पुढे सरकल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. यंदा मान्सून आपल्या १ जून या नेहमीच्या वेळेपूर्वीच दोन दिवस दाखल झाला

आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत कर्नाटक, तामिळनाडू आणि पुडुचेरीसह दक्षिण भारताच्या उर्वरित भागात मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती असून, पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या डोंगराळ प्रदेशासह, ईशान्य भारताच्या सर्व भागांमध्ये तो पोहोचेल, असं हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतलेल्या बारावीच्या परीक्षेच्या गुणपत्रिका आणि इतर संबंधित प्रमाणपत्राचं वाटप येत्या सोमवारी केलं जाणार आहे.

विभागीय मंडळांकडून सोमवारी सकाळी कनिष्ठ महाविद्यालयांना गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र, तपशिलवार गुण दर्शवणारे कनिष्ठ महाविद्यालयीन अभिलेख दिली जातील. त्यानंतर  दुपारी तीन वाजता विद्यार्थ्यांना त्यांच्या महाविद्यालयांतून या सर्व प्रमाणपत्रांचं वाटप केलं जाईल. या संदर्भातील परिपत्रक राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिद्ध केलं आहे.

<><><><><>

राज्य सरकारच्या विविध विभागातली ५२४ रिक्त पदं भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेतली जाणारी महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४, येत्या २१ जुलैला होणार आहे. आयोगानं आज प्रसिद्ध केलेल्या शुद्धिपत्रकात हा घोषणा केली आहे.

ही परीक्षा येत्या ६ जुलैला होणार होती. मात्र राज्य शासनाच्या सूचनेनुसार, अराखीव किंवा आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या च्या उमेदवारांना इतर मागास वर्गाचं जात प्रमाणपत्र मिळालं असेल त्यांना त्या प्रवर्गातून

नव्यानं उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी देण्याचा निर्णय आयोगानं घेतला आहे. त्यामुळे ही परीक्षा ६ जुलैऐवजी २१ जुलैला घेतली जाणार आहे. आधी खुल्या प्रवर्गात असल्यानं जे उमेदवार मूळ जाहिरातीकरीता वयाधिक ठरल्यानं अर्ज सादर  करू शकले नाहीत, अशा इतर मागासवर्गातल्या उमेदवारांना उद्यापासून येत्या ७ जूनपर्यंत, अर्ज सादर करता येतील.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारात आज सलग पाचव्या सत्रात घसरण झाली. त्यामुळं सेन्सेक्स ७४ हजारांच्या पातळीखाली जाऊन बंद झाला निफ्टीनंही २२ हजार ५०० ची पातळी तोडली.  सुरुवातीपासून सुरु असलेली घसरण व्यवहार संपेपर्यंत वाढत गेली. त्यामुळं दिवसअखेर सेन्सेक्स ६१७ अंकांनी घसरुन ७३ हजार ८८६ अंकांवर बंद झाला तर निफ्टी २१६ अंकांची घसरण नोंदवुन २२ हजार ४८९ अंकांवर स्थिरावला. यामुळं गुंतवणूकदारांचं पावणे ४ लाख कोटी रुपयांचं नुकसान झालं. बँकांच्या समभागातल्या तेजीमुळं निफ्टी बँक मात्र आज १८१ अंकांच्या तेजीनं बंद झाला.

**//<><><><><>//**